ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# असहकार चळवळीत नागपूर जिल्हयाचा सहभाग

**प्रा. डॉ. आनंद के. भोयर**
इतिहास विभाग प्रमुख
भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा
जि. गडचिरोली.

**प्रस्तावना-**

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसची सुत्रे महात्मा गांधीच्या हाती आलीत. ब्रिटिश सरकारचे भारतीयांप्रती असलेले उद्दाम व अन्याय धोरण, मुस्लीमांची खिलाफत चळवळ, जालियनवाला बागवरिल हंटर समितीचा अहवाल ह्यामुळे ब्रिटिशविरोधी आंदोलन सुरु करण्यास अनुकूल परिस्थिती होती. म्हणूनच गांधींनी असहकार चळवळीचा निर्णय घेतला. कलकत्ता अधिवेशनात स्वीकृत झालेल्या ठरावावर नागपूर अधिवेशनात शिक्कामोर्तब होताच गांधीनी आंदोलनास प्रारंभ केला.(इ.स.1921) पाहता पाहता हे आंदोलन संपूर्ण देशभरात सुरु झाले त्याचाच एक भाग म्हणून देशाचे मध्यवर्ती केंद्र म्हणजे नागपूर जिल्हयात असहकार चळवळीत महिलांनी पूढाकार घेऊन गांधींच्या आव्हानाला ओ देऊन विविध चळवळी राबविल्या त्यांची माहिती वरिल लेखात घेण्यात आलेली आहे.

**1. अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक -**

कॉंग्रेसचे अधिवेशन पार पडताच 1 जानेवारी, 1921 रोजी नागपूरात अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक झाली. या बैठकीस नागपूर जिल्हयातील असहकाराच्या संकल्पित कार्यक्रम आखण्यासाठी 9 जणांची एक वर्किंग कमिटी निवडण्यात आली. त्यांनी नागपूर जिल्हयात असहकार चळवळ राबविण्याचे ध्येय समोर ठेवले. विदर्भातील मुंजे या समितीचे एक सदस्य होते. '1'

**2. शाळा कॉलेजांवर बहिष्कार -**

नागपूर येथे लाला लजपतरॉय यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय विद्यार्थी परिशद घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी सहकारी सहायता प्राप्त शाळा आणि कॉलेजेसवर बहिष्काराचा प्रस्ताव ठेवण्यात आला.'2' सरकारने चालविलेल्या किंवा सरकारी अनुदानावर चालविल्या जात असलेल्या खास शिक्षण संस्थावर बहिश्कार घालून राष्ट्रीय शाळांत व महाविद्यालयांत प्रवेश घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आहे होते. श्री बारसिंगे यांनीही शिक्षणात महत्वपूर्ण कार्य केले. त्यांचा गांधीजीच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास होता.'3' त्यांनी जुलै 1921 मध्ये राष्ट्रीय महाविद्यालय स्थापन करण्यावर जोर दिला.

**3. पंडीत सुंदरलाल व भगवानदीन यांचे कार्य -**

इ.स. 1920 च्या कॉंग्रेस अधिवेशनानंतर महात्मा भगवानदीनाच्या नेतृत्वाखाली 2 जानेवारी, 1921 रोजी असहकार आश्रमाची स्थापना आणि 3 जानेवारी रोजी टिळक विद्यालयाची स्थापना करण्यात आली. पंडीत सुदरलाल भगवानदीन यांनी या प्रान्तातील असहकार आंदोलणाची धुरा आपल्या खांदयावर घेतली. असहयोग आंदोलनाची सुत्रे त्यांनी आश्रमातून चालविले, त्यांच्या प्रयत्नातूनच नॅशनल एज्युकेशन बोर्डाचे नॅशनल कॉलेज ही संस्था उभारण्यात आली. त्यांना दादासाहेब उधोजी, गोपाळराव देव, शिवदासपंत बारलिंगे याची मदत झाली.'4'चळवळीचा जोर वाढतच होता. त्या दरम्यान

15 मार्च, 1921 भगवानदीन यांना शिवनी येथिल एकाउत्तेजक भाषाणाच्या कारणावरून अटक करण्यात आली आणि दिड वर्षाची शिक्षा सुनविण्यात आली. तसेच पं. सुंदरलाल यांनाही अटक करण्यात येऊन राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. '5'

**4. दारूबंदीचा कार्यक्रम -**

नागपूर जिल्हयातील निरनिराळया भागात कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांनी दारूबंदीचा कार्यक्रम राबविण्यासाठी दारूच्या दुकानांसमोर निदर्शने केली. फेबुवारी 1921 मध्ये सरकारने दारूच्या दुकानांचे लिलाव जाहीर केले. पण दुकानदाराचे मक्ते घेण्यास लोक पुढे येईनासे झाले. त्यामुळे दारूची विक्री कमी झाल्याने अबकारी खात्याच्या उत्पन्नात घट झाली. यावेळी निदर्शकांचा जोर वाढत होता म्हणून सरकारने घरपकड सुरू केली.'6' नागपूरातील दारूगुत्या समोरच्या निदर्शनामुळे फेब्रुवारी 1921 मध्ये बरीच गडबड झाली. गुत्ते जाळण्यात आले. आणि त्यातील दारू रस्त्यावर फेकून देण्यात आली या चळवळीला कोष्टी व मोमिन आघाडीवर होते.'7' दारूबंदीची चळवळ अंधिकच तीव्र होत गेली व त्याची परिणती म्हणून नागपूरात गोळीबार करण्यात आला.

**5. नागपूरात गोळीबार -**

श्री उदारामजी पहेलवान यांनी दारूबंदी व दारूच्या दुकानासमोर पिकेटिंक करण्याचे सत्र सुरूकेले. त्यांना अनेक मंडळीचे सहकार्य होते. त्यांना 25 मार्च, 1921 रोजी एका दारूच्या दुकानांसमोर पिकेटिंग कार्यक्रम सुरू असतांना अटक करण्यात आले असून आंदोलन कर्त्यांमध्ये सरकार विरूध्द एवढा प्रक्षोभ निर्माण झाला की, सरकारला त्यांना सांभळण्यासाठी गोळीबार करावा लागला. त्यात घटनास्थळी 10 लोक ठार झाले आणि 14 जण जखमी झाले.'8'एक पोलीस निरिक्षक आणि चार पोलीस यांना झालेल्या जखमाही गंभीर स्वरूपाच्या होत्या गोळीबाराचा निषेध म्हणून 29 मार्चला नागपूरात कळकडीत हरताळ पाळण्यात आला.'9' प्रक्षुब्ध लोकमताचा विचार करून सरकारने गोळीबाराची चौकशी करण्यासाठी एक त्रिसदस्यीय समिती नेमली.'10'

**6. नागपूर जिल्हयातील महिलांचा सहभाग -**

नागपूर जिल्हयात असहकाराच्या कार्यक्रमावर राश्ट्रीय सभेने शिक्कामोर्तब केले होते त्यामुळे तेथिल स्त्रियांवर त्यांचा प्रभाव पडणे स्वाभाविकच होते. 29 जानेवारी, 1921 रोजी लक्ष्मीबाई परांजपे, श्रीमती चोळकर व त्यांच्या सहकारी महिलांनी मिळून 'सरस्वती मंडळ' या नावाने एक महिला संस्था स्थापन केली या संस्थेचा उद्देश स्वदेशीला प्रोत्साहन देणे, घरगुती उद्योग सुरू करणे असा होता. स्वदेशीच्या प्रचाराबरोबरच विदेशी मालाचा बहीष्कारही हया संस्थेने सुरू केला.'11'30 सप्टेबंर रोजी नागपूरच्या चिटणीस पार्क मैदानावर जाहीर झालेल्या सार्वजनिक सभेत भगवती देवीचे प्रभावी भाशण झाले. त्या कॉंग्रेस कमिटीच्या सदस्य होत्या.

भगवतीदेवी लक्ष्मीबाई परांजपे, श्रीमती चोळकर, जानकीदेवी बजाज यांनी नागपूर महिलांमध्ये असहकाराची जाणीव निर्माण केली. महिला असहकार चळवळीत सामिल करून असहकार चळवळीला चांगलाच प्रतिसाद दिला.'12'

**7. विदेशी मालावर बहिष्कार -**

30 सप्टेंबर, 1921 रोजी चिटणीस पार्कवर झालेल्या सार्वजनिक सभेनंतर तेथे परदेशी मालाची मोठी होळी पेटविण्यात आली परदेशी कपडयांच्या ढिगावर एक पांढरा मुखवटा होता, त्याच्या बाजूला एका फळीवर '150 वर्शाचा वृध्द मरत आहे' शब्द लिहिलेले होते 13ङ3ङ

'13'3'

26 जुलै, 1921 रोजी ही नागपूरात विदेशी कपडयांची होळी करण्यात आली व उपस्थित लोकांनी व शेकडो व्यापा-यांनी परदेशी माल न वापरण्याचा, न मागविण्याचा व शिल्लक असलेला परदेशी माल न

विकण्याचा, त्याचप्रमाणे अनेक लोकांनी स्वदेशी कापड वापरण्याच्या शपथा घेतल्या.'14'

### 8. सरकारी पदव्या व वकिलीवर त्यागपत्रे -

नागपूर जिल्हयातही पदव्या व वकिलीवर त्यागपत्रे ठेवण्यात आली होती. त्यात बॅ. अभ्यंकर, बलवंत मंडलेकर, भवानीशंकर नियोगी यांचा असहकारांच्या चळवळीला विरोध होता. तरीही त्यांनी चळवळीला प्रोत्साहन म्हणून त्यांनी आपल्या वकिलीवर त्यागपत्रे दिली होती. यांच्या सोबतच बॅ. देशमुख, नारायनराव वैध, बाबुराव हरकरे, सोबतच लोकनायक बापूजी अणे यांनीही आपल्या वकिलीवर त्यागपत्रे सोडली. '15'

### 9. अनेक जातीय परिषदांचें योगदान -

नागपूरमध्ये मराठा जातीची एक राष्ट्रीय परिषद झाली त्यांनी कॉंग्रेसच्या असहाकार कार्यक्रमाला समर्थन दिले होते. मराठा विद्यार्थी परिषदेनेही सरकारी विद्यालयांवर बहिष्कार टाकला तसेच क्षत्रिय लोधी समाज आणि क्षत्रिय , माळि समाज यांनीही राश्ट्रीय विचार प्रणालीला समर्थन दिले.'16' या प्रकारे नागपूर जिल्हयातील अनेक जातीय परिशदांचा पूर्णतः असहकार चळवळीला पाठिंबा मिळाला.

### 10. डयूक ऑफ कॅनॉटच्या आणि प्रिंस ऑफ वेल्स यांच्या स्वागतावर बहिश्कार -

डयूक ऑफ कॅनॉट हे 18 जानेवारी, 1921 रोजी नागपूरात येणार होते. त्यांच्या स्वागतावर नागपूर डिस्ट्रिक्ट कौंसिलने बहिश्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे खाजगीरित्या येऊन परस्पर बालाघाटच्या जंगलात शिकारीला निघून गेले.'17' प्रिंस ऑफ वेल्सने जे नंतर राजा 8 वे एडवर्ड होणार होते. त्यांच्या स्वागतावरही बंदी घालण्यात आली. मुंबईलाही स्वयंसेवक, कार्यकर्ते व पोलीस यांच्यात हाथापाई झाली नागपूरातही त्यांच्या स्वागतासंबंधी बराच रोस निर्माण झाला व शेवटी त्यांचे स्वागत स्वागतभवनात न करता शासकीय भवनात करण्यात आला.'18'

### 11. नागपूर जिल्हयातील इतर घटना -

नागपूर जिल्हयातील स्वतंत्रता आंदोलनामध्ये डॉ. हेडगेवारांचे असहकार चळवळीत मोलाचे कार्य होते. डॉ. बाळकृष्ण शिवराज मुंजे यांची भाषणे इतकी क्रांतीकारी आणि जहालमताची असत की, ती इंग्रज शासणाला बोचत असे म्हणून त्यांच्या जोषपूर्ण भाषणांमुळे सरकाने एका महिण्यासाठी भाषण देण्याची त्यांच्यावर बंदी घातली होती.'19' नागपूर जिल्हयात स्वदेशीच्या कॉंग्रेस सदस्य संखेत वाढझाली. असहकार चळवळीचा एक भाग म्हणून कौंसिलवर बहिष्कार करण्यात आला. इस. 1920 मध्ये कौंसिल निवडणूकीतून अनेक उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. नागपूरच्या नेटिव्ह जनरल ग्रंथालयाचे याच काळात 'नॅशनल लायब्ररी' असे नामांकन करण्यात आले. शिपायांनी सुध्दा आपले युनियन स्थापन करून विदेशी कपडे न शिवण्याचा निश्चय केला.

### 12. सरकारची दडपशाही आणि अनेकांना अटक -

असहकार आंदोलनाला नागपूर जिल्हयातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दारूबंदी व बहिष्कार कार्यक्रम नागपूर जिल्हयात मोठया प्रमाणात मोठया जोराने करण्यात आले. त्याकरिता सरकारला 28 मार्चला गोळिबारही करावा लागला. सरकाने सर्वत्र दडपशाही करण्याचा प्रयत्न केला.

सरकारने नागपूर जिल्हयात अटक सत्र चालू केले. डॉ. चोळकर भगवानदीन यांना अटक करण्यात अली. त्यानंतर अर्जूनलाल सेठी, पं. सुदंरलाल, नारायनराव दंदे, मोरोपंतराव पोहनकर, कर्मवीर पाठक यांच्यावर निरनिराळया कारणांनी राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला व त्यांना सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली. नागपूर जिल्हयातील अनेक महत्वाच्या नेत्यांना सरकारने अटक केली व त्यांना निरनिराळया शिक्षा

सुनावण्यात आल्या.'20'

**13. चौरी चौराची हिसंक घटना व असहकार आंदोलनाल स्थगिति (04 फेब्रुवारी, 1922)-**

गांधीजीने नागपूर कॉंग्रेस अधिवेशनात जाहीर केले होते की, असहकार चळवळ ही अहिंसेच्या मार्गानेच चालावी परंतु चौरीचौरा या ठिकाणी आंदोलकांनी 4 फेब्रुवारी रोजी पोलीस ठाणे जाळण्याची व त्यात काही पोलीस जळल्याची बातमी गांधीजींना कळली. या हिसंक घटनेमुळे गांधीजींनी असहकार आंदोलन मागे घेण्याचे आव्हाहन केले.

गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेण्याच्या निर्णयामुळे नागपूर जिल्हयातील असहकार चळवळीचा उत्साह कमी झाला. त्यानंतर आंदोलनाची नागपूर जिल्हयातील आग शमली व चळवळीला संथ गती आली.

अचानक चळवळ मागे घेतल्यामुळे ब-याच कार्यकर्त्यानी गांधीजीवर टिका केल्यापण गांधीजीचा निर्णय हा योग्य होता. त्याचे कारण की गांधीजींनाही चळवळ हिसंकमार्गाने चालवायची नव्हती.'21'

**14. असहकार चळवळीचा परिणाम -**

गांधीजींने चळवळ अचानक मागे घेतल्यामुळे नागपूर जिल्हयातही चळवळ ठप्प झाली. त्याकारणास्तव चिटणीस पार्क येथे 13 आणि 14 एप्रिलला एक सभा घेण्यात आली. त्याचे अध्यक्षस्थान डॉ. चोळकरांकडे होते. '22'त्या सभेमध्ये असहकार चळवळ नागपूरात सुरूच ठेवायचे असे ठरविले. परंतु अध्यक्षाने त्याला मंजूरी दिली नाही. त्या कारणाने काही नेत्यांमध्ये मतभेद निर्माण झाले व त्याची परिणती म्हणून त्याच दिवशी दुसरी सभा घेण्यात आली त्यांच्यातही असहकार चळवळ चालू ठेवावी की नाही यात पुन्हा मतभेद झाले. व कार्यकर्त्यामध्ये दोन गट निमार्ण झाले. त्यात एक चेंजर (Changer) व दुसरा नोचेंजर (No Changer) असे दोन गट पडले. पहिल्या गटात जनरल मंचरशा आवासी, अंबुलकर व मराठे होते. तर नो चेंजर गटात डॉ. मुंजे, डॉ. चोळकर, परांजपे, बॅ. अभ्यंकर, चांदेकर, शास्त्री इ. कार्यकर्ते होते. शेवटी मध्यरात्रीपर्यंत ही सभा सुरू राहून असहकार चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेतला. '23'

***संदर्भ ग्रंथ सूची -***


1. *घुमडे गजानन - नागपूर नगरीचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान पृ.क्र. 24*
2. *डॉ. अंधारे भा. रा. संशोंधन शिंपले भाग- 2 पृ.क्र. 70*
3. *फडके य. दी.- 20 साव्या शतकातील महाराष्ट्र पृ.क्र. 40*
4. *पाठक अरूणचंद्र (संपा)-संपादकीय महाराष्ट्र गॅझेटिअर नाग. जिल्हा, भाग- 1 पृ.क्र. . 210*
5. *बियानी बिजलाल- शुक्ल अभिनंदन ग्रंथ -पृ.क्र. 147*
6. *पाठक अरूनचंद- महा. गॅझटिअर नाग. जिल्हा भाग - 1 पृ.क्र. . 210*
7. *घुमडे गजानन - कित्ता -पृ.क्र. . 26 -27*
8. *डॉ. अंधारे भारा कित्ता.-पृ.क्र. 70*
9. *पाठक अरूणचंद्र - कित्ता -पृ.क्र. . 211*
10. *फडके म. दी. - कित्ता-पृ.क्र. . 40*
11. *डॉ. दमयंती पाठक - वैदर्भिय महीलांचे स्वा. संग्रा. सहकार्य पृ.क्र. . 50*
12. *घुमडे गजानन - कित्ता पृ.क्र. 27- 28*
13. *पाठक दमयंती - कित्ता पृ.क्र. 50*
14. *धुमडे गजानन - कित्ता पृ.क्र.28*
15. *धुमडे गजानन - कित्ता*
16. *बियानी ब्रिजलाल - कित्ता पृ.क्र. 197*
17. *व्यास नंदकिशोर- नागपूर नगर एवं स्वातंत्र्यता आंदोलन- पृ.क्र. 119*
18. *मिश्रा डी.पी. स्वा. आंदोलन इतिहास पृ.क्र. 325*
19. *डॉ. वक्कानी नि. आ. आधुनिक विदर्भचा इतिहास पृ.क्र. . 104*
20. *धुमडे गजानन- कित्ता पृ.क्र. . 29- 30*
21. *धुमडे गजानन - कित्ता*
22. *पाठक अरूनचंद- नागपूर जिल्हा गॅझेटिअर भाग - 1 -पृ.क्र. . 211*
23. *व्यासनंदकिशोर - कित्ता पृ.क्र. . 129*